# विद्यार्थी घडवण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची

## प्रा. मीनल वाघ यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी** | बोरगाव

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात विशाखा समिती अंतर्गत प्राचार्य अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'विद्यार्थी विकासात शिक्षकांची भूमिका' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रा. मीनल वाघ उपस्थित होत्या. त्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी आयुष्यातील ४० वर्षे शिक्षक म्हणून देशासाठी वाहून घेतली. शिक्षकांचा आदर करण्यावर त्यांनी नेहमीच भर दिला. समाजाला योग्य दिशा देण्यात खरा शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावतो, अशी त्यांची धारणा होती. खरा गुरू आपल्या शिष्याला प्रतिकूल परिस्थितीचा सामना करायला शिकवतो आणि त्यांचे जीवन सुधारण्यात मोलाचे योगदान देतो, त्यामुळे शिक्षकांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. शिक्षकांनी केलेल्या या सर्व योगदानाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची हा दिवस उत्तम संधी आहे, असे प्रतिपादन केले.

यावेळी गीता देशमुख, योगिराज चव्हाण, तेजस्विनी वाघमारे, दुर्गा गावित व विद्यार्थ्यांनी आपली शिक्षकाप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. कविता भोये यांनी केले. एसवायबीएस्सीची विद्यार्थिनी गीता देशमुखने आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Divymarathi 19_9-23

*Sakal 17_9*

# 'मेरी माटी मेरा देश' उपक्रम



**सुरगाणा ।** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सुरगाणा येथे 'मेरी माटी मेरा देश' हा उपक्रम राबवण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सोमनाथ पावडे यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. अरुण पाटील, उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी अमृत कलशात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आपल्या गावातील माती घेऊन कलशात टाकत देशाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा.कविता भोये यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे शैक्षणिक प्रवेशक प्रा. सुरेश भोये यांच्यासह सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

# ओझोन थर पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाचा

## प्रा. अहिरे : सुरगाणा महाविद्यालयात व्याख्यान

▶ **सकाळ वृत्तसेवा**

सुरगाणा, ता. १६ : येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोल विभागांतर्गत जागतिक ओझोन दिनानिमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सुरेश भोये होते. उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे यांनी 'पर्यावरण संवर्धनासाठी ओझोन थराचे महत्त्व' विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. भूगोल विभागांतर्गत ओझोन दिवस साजरा करण्यात आला. प्रा. विजय अहिरे यांनी सांगितले, की गेल्या काही दशकात ओझोनच्या थरावर काही प्रदूषित घटकांचा परिणाम झाल्यामुळे या थराला संयुक्त संस्थाने या देशाच्या क्षेत्रफळएवढे छेद पडले होते. त्याचे भूपृष्ठावरील सजीव सृष्टीवर दुष्परिणाम जाणवू लागले होते. तेव्हा १९८७ मोन्त्रेअल प्रोटोकॉल निश्चित करून ओझोन संवर्धनासाठी १९७ देशांनी सहभाग नोंदवून त्यावर सह्या केल्या. तेव्हापासून ओझोन थराच्या संवर्धनासाठी प्रयत्न झाल्याने आज काही प्रमाणात त्यात सुधारणा झाली आहे. अन्यथा हा थर नष्ट झाला असता तर पृथ्वीवरील सजीव सृष्टी नष्ट झाली असती. ओझोननिर्मिती, त्यावर परिणाम करणारे क्लोरोफ्लोरो कार्बन व इतर वायू यांच्याविषयी आणि ओझोन थर कशा पद्धतीने पृथ्वीचे संरक्षण करतो याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात प्रा. सुरेश भोये यांनी, जागतिक स्तरावर वेगवेगळ्या समस्या निर्माण होत आहेत. पर्यावरण व सजीव सृष्टी वाचविण्यासाठी सर्वांनी पर्यावरणाचे संवर्धन केले पाहिजे. प्रा. कविता भोये यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. सोमनाथ पावडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. सुनील घुगे, प्रा. वसंत गायकवाड, प्रा. वसावे, प्रा. पालवे, बहुसंख्येने प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

<table>
<tr>
<td></td>
<td>


## सुरगाणा महाविद्यालयात मेरी माटी मेरा देश उपक्रम

**प्रतिनिधी** | बोरगाव

महात्मा गांधी विद्यामादीर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सुरगाणा येथे सोमवारी (दि. ११) 'मेरी माटी मेरा देश' हा उपक्रम साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सोमनाथ पावडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य विजय अहिरे यांनी या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना भारत देश आज जगात सर्वात मोठी लोकशाही असलेला महासत्ता देश आहे. देशाने अनेक क्षेत्रांत प्रगती केली आहे. मात्र, देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी बलिदान दिले. स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, ज्ञात-अज्ञात देशवासियांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या त्यागामुळेच स्वातंत्र्याची पहाट उगवली. आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ होत असतानाच त्यांच्या या त्यागाचे स्मरण करणे आपले सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. . याप्रसंगी अमृत कलशात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आपल्या गावातील माती घेऊन कलशात टाकत देशाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

## ओझोन थर पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाचा



*Deshoot 18-9*

</td>
</tr>
<tr>
<td>

*Divyamarathi 14_9*<br>*Deshdoot 14_9*

</td>
<td></td>
</tr>
</table>

## मेरी माटी, मेरा देश उपक्रम का आयोजन

**सुरगाणा.** महात्मा गांधी विद्या मंदिर संचालित, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, राष्ट्रीय सेवा योजना के संयुक्त तत्वावधान में सुरगाणा में 'मेरी माटी, मेरा देश' उपक्रम का आयोजन महाविद्यालय के प्राचार्य अरुण पाटिल के मार्गदर्शन में किया गया. कार्यक्रम का प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सोमनाथ पावडे ने किया. महाविद्यालय के उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे ने मार्गदर्शन किया. कार्यक्रम का संचालन प्रा. कविता भोये ने किया. इस समय महाविद्यालय के शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. सुरेश भोये सहित प्राध्यापक, कर्मचारी और राष्ट्रीय सेवा योजना के स्वयंसेवक उपस्थित थे.

**महाविद्यालय के शैक्षणिक पर्यवेक्षक रहे मौजूद**

Navbharat 14_9

# देशदूत

## कार्यशाळेत कौशल्यविकास मार्गदर्शन

सुरगाणा । दि. १ प्रतिनिधी



सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा झाली.

कार्यशाळेचे आयोजन महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक इंग्रजी अभ्यास मंडळ, इंग्रजी विभाग, सुरगाणा यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. ' हार्ड स्किल्स व सॉफ्ट स्किल्स द्वारे एकत्रीकरण ' हा कार्यशाळेचा प्रमुख विषय होता. प्रास्ताविक डॉ. कमलाकर गायकवाड, इंग्रजी विभागप्रमुख यांनी केले. सध्याच्या युगात ही कौशल्ये किती महत्त्वाची आहेत याचे सविस्तर वर्णन त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हार्ड व सॉफ्ट स्किल्स यांचा व्यावहारिक जीवनातील उपयोग सोदाहरण स्पष्ट करून सांगितला. डॉ. कमलाकर गायकवाड यांनी पीपीटी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना हार्ड स्किल्स व सॉफ्ट स्किल्स यांची व्याख्या, महत्त्व, स्वरूप, त्यांच्यातील फरक यांचे प्रत्यक्ष उपयोग व त्यांची सांगड कशी घालावी व ही कौशल्ये कशी आत्मसात करावी तसेच आपले व्यक्तिमत्त्व कसे विकसित करावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले त्यांनी विविध हार्ड स्किल्स व सॉफ्ट स्किल्स यांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना या कौशल्यांचा कसा उपयोग होईल हे देखील समजावून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. जोपळे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे व प्रा. सुरेश भोये शैक्षणिक समन्वयक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

Deshdoot Edition
Sep 2, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

# राष्ट्रीय क्रीडादिन उत्साहात

▸▸सुरगाणा । दि. १ प्रतिनिधी

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .ए. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे यांनी मुलांना राष्ट्रीय क्रीडादिन निमित्त विविध खेळांचे महत्त्व हॉकीचा सुवर्ण इतिहास आणि इतर क्रीडा क्षेत्रातील उच्च कामगिरीचा आढावा विद्यार्थ्यांसमोर ठेवला. महाविद्यालयातील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचे कौतुक केले. जिल्ह्यातील इतर विद्यार्थ्यांनीही प्रेरणा घेऊन खेळ आणि सर्वांगीण विकास करावा यासाठी प्रोत्साहन दिले. कार्यक्रमासाठी शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. एस. एम. भोये, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते क्रीडा संचालक अजिंक्य उगले , प्रा. सोमनाथ पावडे यांनी संयोजन केले.

Deshdoot 2_9

# सुरगाणा महाविद्यालयात एड्सबाबत मार्गदर्शन

सुरगाणा, ता. १ : येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वक्तृत्व, रिल्स, पोस्टर स्पर्धा झाल्या. प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील अध्यक्षस्थानी होते. राजेश मिस्त्रा यांनी एड्सबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य पाटील यांचे अध्यक्षस्थीय भाषण झाले. प्रा. सोमनाथ पावडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. कविता भोये यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. रवींद्र भांडारे यांनी आभार मानले. उपप्राचार्य प्रा. व्ही. डी.अहिरे, राकेश महाले, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Sakal _2_9

august

# सुरगाणा महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**प्रतिनिधी** | बोरगाव

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील, उपप्राचार्य व्ही. डी. अहिरे यांनी मुलांना राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध खेळांचे महत्त्व, हॉकीचा सुवर्ण इतिहास आणि इतर क्रीडा क्षेत्रातील उच्च कामगिरीचा आढावा सादर केला. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनीही यातून प्रेरणा घेऊन खेळाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमास प्रा. एस. एम. भोये, क्रीडा संचालक अजिंक्य उगले, प्रा. सोमनाथ पावडे उपस्थित होते.

Deshdoot 31_8

# नवभारत

## सुरगाणा में रैगिंग जनजागृति कार्यक्रम का आयोजन

■ सुरगाणा, (सं). महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा में आय. क्यू. ए. सी. विभाग और विद्यार्थियों की विकास मंडल के संयुक्त तत्वावधान में एंटी रैगिंग जनजागृति कार्यक्रम का आयोजन किया गया था. इस समय महाविद्यालय के प्राचार्य डॉ. अरुण पाटिल और विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. सुनील घुगे ने छात्रों को मार्गदर्शन किया. संचलन प्रा. कविता भोये और आभार क्रीडा संचालक अजिंक्य उगले ने व्यक्त किए.



इस समय महाविद्यालय के उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे, शैक्षणिक सुपरवायझर प्रा. सुरेश भोये, आयक्यूएसी विभाग के प्रमुख डॉ. रवींद्र भंडारे, महाविद्यालय के प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित थे.

Nashik-plus Edition
31-august-2023 Page No. 3
epaper.enavabharat.com



अँटी रॅगिंग जागृती कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. अरुण पाटील.

## सुरगाणा महाविद्यालयात अँटी रॅगिंग जागृती कार्यक्रम

प्रतिनिधी | सुरगाणा

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आयक्यूएसी विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या अँटी रॅगिंग जागृती कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अरुण पाटील होते. त्यांनी अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करावे. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्त्व घडविण्यावर लक्ष केंद्रित करावे. चांगल्या मित्रांची संगत बाळगावी. महाविद्यालयामध्ये असभ्य वर्तन घडणार नाही व इतरांना त्रास होणार नाही याची खबरदारी बाळगावी असे सांगितले. प्रमुख वक्ते विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. सुनील घुगे म्हणाले की, महाविद्यालयात अँटी रॅगिंग कमिटी आहे. तसेच रॅगिंगसारख्या अपराधाविरोधात असलेले राज्य शासनाचे कठोर कायदे व नियम यांविषयी सखोल माहिती दिली. महाविद्यालयात किंवा बाहेर रॅगिंग करण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रत्यक्ष मानसिक अथवा शारीरिक हानी होणे याचबरोबर तशी शक्यता जरी असेल तरी ती रॅगिंग म्हणून ग्राह्य धरण्यात यावी अशी कठोर तरतूद कायद्यात करण्यात आलेली आहे. अपराध सिद्ध झाल्यानंतर दोन वर्षांचा कारावासाची आणि दहा हजार रुपये दंड करण्याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारींसंदर्भात महाविद्यालयात अँटी रॅगिंग कमिटी व विद्यार्थी तक्रार निवारण समिती असते. सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले.

क्रीडा संचालक अजिंक्य उगले यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे, शैक्षणिक सुपरवायझर प्रा. सुरेश भोये, आयक्यूएसी विभागप्रमुख डॉ. रवींद्र भंडारे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

Sakal 31_8_23

लोकमत

न्यूज Inbox

## सुरगाणा महाविद्यालयात पंचप्रण शपथ

**बोरगाव :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा आणि सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'पंचप्रण शपथ' उपक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील होते. भारत महासत्ता बनण्यासाठी पंचप्रण शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. प्रा. एस.एम. भोये यांनी ही शपथ वदवून घेतली. प्रास्ताविक प्रा. सोमनाथ पावडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले.

Hello Nashik Gramin
Page No. 4 Aug 20, 2023
Powered by: erelego.com



● महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित क कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे ध्वजारोहण प्राचार्य डॉ. ए. व्ही.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा व्ही. डी. अहिरे, शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. एस. एम. भोये, अजिंक्य उगले, प्रा. सोमनाथ पावडे आदींसह प्राध्यापकवृंद, कर्मचारी उपस्थित होते.

Deshdoot _17_8_

लोकमत

# सुरगाणा महाविद्यालयात ॲन्टि रॅगिंग जागृती कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोरगाव :** सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आय. क्यू. ए. सी. विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ॲन्टि रॅगिंग जागृती कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. अरुण पाटील अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करावे, नियमित अभ्यास करून व्यक्तिमत्त्व घडवण्यावर लक्ष केंद्रित करावे, महाविद्यालयामध्ये असभ्य वर्तन घडणार नाही व इतरांना त्रास होणार नाही याची खबरदारी बाळगावी, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. सुनील घुगे म्हणाले की, महाविद्यालयात ॲन्टि रॅगिंग कमिटी आहे. तसेच रॅगिंगसारख्या अपराधाविरोधात शासनाचे कठोर कायदे व नियम याविषयी माहिती दिली. महाविद्यालयात किंवा बाहेर रॅगिंग करण्यास मनाई करण्यात आली असून, अपराध सिद्ध झाल्यानंतर दोन वर्षांपर्यंत कारावासाची आणि दहा हजार रुपये दंड करण्याची तरतूद असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले, तर आभार क्रीडा संचालक अजिंक्य उगले यांनी मानले.

Hello Nashik Gramin
Page No. 2 Aug 29, 2023
Powered by: erelego.com

## सुरगाणा महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन

▸ सकाळ वृत्तसेवा

सुरगाणा, ता. १३ : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब, ग्रामीण रुग्णालयातर्फे आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त कार्यक्रम झाला झाला.

ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक राजेश मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना एड्सबद्दल मार्गदर्शन प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील, उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे, पर्यवेक्षक प्रा. एस. एम. भोये उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सोमनाथ पावडे यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. कविता भोये यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

Sakal 14_8

# प्रा. सोमनाथ पावडे यांचा सत्कार

सुरगाणा, ता. १३ : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व विभागीय समन्वयक प्रा. सोमनाथ पावडे यांना उल्लेखनीय कार्याबद्दल पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्रशंसा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याबद्दल प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, युवा नेते डॉ. अद्वय हिरे, सांस्कृतिक विभागप्रमुख संपदा हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, उपाध्यक्ष डॉ. हरीश आडके, महाविद्यालयीन विकास समितीचे संस्था प्रतिनिधी प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांनी त्यांचे अभिनंदन केले. उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे, शैक्षणिक सुपरवायझर प्रा. एस. एम. भोये, कार्यालयीन अधीक्षक शिंदे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



**सुरगाणा : प्रा. सोमनाथ पावडे यांचा सत्कार करताना प्राचार्य पाटील.**

Deshdoot 14_8

# सुरगाणा महाविद्यालयातील प्रा. सोमनाथ पावडे यांना रासेयोचा प्रशंसा पुरस्कार प्रदान



**बोरगाव |** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सोमनाथ पावडे यांना उल्लेखनीय कार्याबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्रशंसा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याबद्दल प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, डॉ. अद्वय हिरे, विश्वस्त संपदा हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, उपाध्यक्ष डॉ. हरिष आडके, प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे, प्रा. एस. एम. भोये, अधीक्षक शिंदे, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

Divymarathi 12_8

देशदूत

# सुरगाणा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शपथ

**सुरगाणा ।** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजने यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त मेरी बेटी मेरा देश उपक्रमांतर्गत 'पंच प्रण शपथ' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील होते. यावेळी प्राचार्य पाटील यांनी सांगितले की, भारत हा जगातील सर्वात तरुण व बलशाली राष्ट्र आहे. २०४७ पर्यंत भारत हा महासत्ताक असेल. त्यासाठी माननीय पंतप्रधान यांनी आपणास जे पंच प्रण दिले आहे. विकसित भारत, गुलामीच्या सर्व खुणा पुसून टाका, आपल्या वारसांचा अभिमान बाळगा, एकतेचं सामर्थ्य, नागरिकांची कर्तव्ये हे आपण अंगिकारले पाहिजे. तरच आपण महासत्ताक होऊ, असे ते म्हणाले. याप्रसंगी शैक्षणिक पर्यवेक्षण प्रा. एस.एम.भोये यांनी ' पंच प्रण शपथ' शपथ वदून घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सोमनाथ पावडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.व्ही.डी.अहिरे यांच्यासह प्राध्यापकवृंद, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

Deshdoot Edition
Aug 11, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com

नाशिक' जिल्हा पुलआउट 11-08-2023

# सुरगाणा महाविद्यालयात आदिवासी महिलांचा केला यथोचित सन्मान

प्रतिनिधी । बोरगाव

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विशाखा समिती व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी बिरसा मुंडा व महात्मा गांधी यांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून आदिवासी महिलांचा सत्कार आयोजित करण्यात आला. याप्रसंगी सुनंदा कुंभार यांचा सत्कार प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. मंजुळा धूम यांचा सत्कार उपप्राचार्य प्रा. व्ही. डी.अहिरे यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. एस. एम. भोये यांनी केले. आभार प्रा. कविता भोये यांनी मानले. या प्रसंगी कार्यालयीन अधीक्षक शिंदे, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी बहुमोल प्रयत्न केले.

# सुरगाणा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पंच प्रण शपथ

**प्रतिनिधी** | बोरगाव

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त 'मेरी बेटी, मेरा देश' उपक्रमांतर्गत 'पंच प्रण शपथ' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील यांनी भारत हा जगातील सर्वात तरुण व बलशाली राष्ट्र आहे. २०४७ पर्यंत भारत हा महासत्ताक असेल. त्यासाठी माननीय पंतप्रधानांनी आपणास जे पंच प्रण दिले आहे. विकसित भारत, गुलामीच्या खुणा पुसून टाका, आपल्या वारशाचा अभिमान बाळगा, असे आवाहन केले. यावेळी शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. एस. एम. भोये यांनी 'पंच प्रण शपथ' शपथ वदून घेतली. प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सोमनाथ पावडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे यांच्यासह प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

Divyamarathi 10_8

# सुरगाणा महाविद्यालयात पंचप्रण शपथ

सुरगाणा, ता. ८ : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवानिमित्त 'मेरी बेटी-मेरा देश' उपक्रमांतर्गत पंचप्रण शपथ देण्यात आली. प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील यांनी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक प्रा. एस. एम. भोये, प्रा. सोमनाथ पावडे, प्रा. कविता भोये, उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे उपस्थित होते.

Sakal 9_8

# नई राष्ट्रीय शिक्षा नीति से शिक्षा क्षेत्र में होगा बदलाव

## डॉ. आर. वाई. भंडारे का प्रतिपादन

■ **सुरगाणा,** (सं.) नई शैक्षणिक नीति के माध्यम से समानता, गुणवत्ता, क्षमता और उत्तरदायित्व आदि मूलभूत स्तंभ पर आधारित है. इससे विद्यार्थियों का सर्वांगीण विकास होगा. इस नीति में शिक्षा, शिक्षक प्रशिक्षण, विकास और बहुभाषा को प्रोत्साहन देने के लिए तकनीक का उपयोग किया जाएगा. उच्च शिक्षा में बहुविद्याशाखा शिक्षा को बढ़ावा देकर क्रेडिट आधारित प्रणाली पेश कर संशोधन और नाविन्यपूर्ण उपक्रम को बढ़ावा देने के लिए राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान स्थापन कर उच्च शिक्षा में परिवर्तन लाया जाएगा. डॉ. आर. वाय. भंडारे ने कहा कि उच्च शिक्षा में मूलभूत बदलाव कर देश को विकसित किया जाएगा. वे महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा में आयक्यूएसी विभाग द्वारा नई शैक्षणिक नीति 2020 इस विषय



पर आयोजित संगोष्ठी को संबोधित कर रहे थे. इस समय महाविद्यालय के प्राचार्य डॉ. ए. वी. पाटिल, उपप्राचार्य प्रा. वी. डी. अहिरे, एस. एम. भोये सहित प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी और विद्यार्थी उपस्थित थे. कार्यक्रमा का संचालन के. के. भोये और आभार भगवान महाले ने व्यक्त किए.

Navbharat 1_8

July 2023

# ‘शैक्षणिक धोरण’ विषयावर व्याख्यान



**सुरगाणा । दि. ३० प्रतिनिधी**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे एलक्युएसी विभागातर्फे नवीन शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्क्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील होते. प्रमुख वक्ते डॉ. आर. वाय. भंडारे होते. डॉ. आर. वाय. भंडारे यांनी सांगितले की, नवीन शैक्षणिक धोरण हे प्रवेश, समानता, गुणवत्ता, परवडणारी क्षमता आणि उत्तरदायित्व या मूलभूत स्तंभावर आधारित आहे. नवीन शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून अधिक लवचिक आणि सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली प्रदान करणे हा आहे. या धोरणात शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण आणि विकास आणि बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही भर देण्यात आला आहे .तसेच उच्च शिक्षणामध्ये बहुविद्याशाखीय शिक्षणाला चालना देऊन क्रेडिट आधारित प्रणाली सादर करून आणि संशोधन आणि नाविन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान स्थापन करून उच्च शिक्षणात परिवर्तन घडवून आणण्यावर भर आहे. उच्च शिक्षणात मूलभूत बदल करून देशाला विकसित करण्याचे नवीन शैक्षणिक धोरणामध्ये उद्दिष्ट ठेवलेले आहे. सूत्रसंचालन प्रा. के. के. भोये यांनी केले तर आभार प्रा. भगवान महाले यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. व्ही. डी.अहिरे, प्रा. एस. एम. भोये यांच्यासह प्राध्यापकवृंद, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

Deshdoot 31_7



# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर व्याख्यान

[illegible]

Divymarathi 30_7

11:33 85%

**Win upto₹10Lac**

Withdraw winnings instantly using UPI.

zupee.com

Download >

# देशदूत

## आरोग्य तपासणी शिबिर



**सुरगाणा ।** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात महात्मा गांधी विद्यामंदिर व आदिवासी सेवा समिती नाशिक संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ. स्मिता हिरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिर आणि प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले.

सुरगाणा ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ. चौधरी, वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख, प्रयोगशाळा अधिकारी सारिका भोकरे, प्रतिभा शिंपी, समुपदेशक श्री मिश्रा, प्रयोगशाळा अधिकारी राकेश महाले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तपासणी शिबिर घेतले. यावेळी महाविद्यालयातील ४४ विद्यार्थ्यांनी शिबिरात सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील यांनी डॉ. स्मिताताई हिरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील पुणे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.व्ही.डी.अहिरे, शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. एस. एम. भोये, डॉ. रवींद्र भंडारे, प्राध्यापकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Deshdoot Edition
Jul 15, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

ZUPEE

Deshdoot 15_7

दिव्य मराठी

# नाशिक' जिल्हा पुलआउट 15-07-2023

## सुरगाणा कॉलेजमध्ये हिमोग्लोबिन तपासणी शिबिर



बोरगाव | महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात ४४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

महात्मा गांधी विद्यामंदिर व आदिवासी सेवा समिती नाशिक संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ. स्मिता हिरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयक्यूएसी आणि प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिर घेण्यात आले. सुरगाणा ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय चौधरी, प्रयोगशाळा अधिकारी सारिका भोकरे, प्रतिभा शिंपी, समुपदेशक मिश्रा, प्रयोगशाळा अधिकारी राकेश महाले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तपासणी शिबिर घेतले.

प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. सुनील पुणे यांनी केले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे, प्रा. एस. एम. भोये, डॉ. रवींद्र भंडारे व विद्यार्थी उपस्थित होते.

Divyamarathi 15_7

# जागतिक लोकसंख्यादिन



**सुरगाणा ।** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे जागतिक लोकसंख्यादिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए .व्ही. पाटील होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. एस. यू. देवरे उपस्थित होते. डॉ. देवरे म्हणाले की, वाढत्या लोकसंख्येविषयी लोकांना जागरुक करण्यासाठी दरवर्षी जागतिक लोकसंख्यादिन हा ११ जुलै रोजी साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याचा मुख्य उद्देश असा आहे की, वाढत्या लोकसंख्येच्या समस्यांविषयी समाजातील लोकांना एकत्रितपणे काम करायला लावून विविध प्रकारचे कार्यक्रम आखून आणि कृती आयोजित करून लोकसंख्याविषयी समस्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील यांनी सांगितले की, लोकसंख्यावाढीने अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने संकल्प करून लोकसंख्या नियत्रंणात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. प्रस्ताविक भूगोल विभागप्रमुख उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे यांनी केले. सूत्रसंचालन शैक्षणिक सुपरवायझर प्रा. एस. एम. भोये यांनी केले तर आभार प्रा. आर. ए. जगताप यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Deshdoot 13_7

# विकासासाठी लोकसंख्या नियंत्रण आवश्यक

## सुरगाणा महाविद्यालयात डॉ. एस. यू. देवरे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | बोरगाव



जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त सुरगाणा महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. एस. यू. देवरे.

जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश असा आहे की, वाढत्या लोकसंख्येच्या समस्यांविषयी समाजातील लोकांना एकत्रितपणे काम करायला लावून विविध प्रकारचे कार्यक्रम आखून आणि कृती आयोजित करून लोकसंख्याविषयी समस्या कमी [illegible]ठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, [illegible]णीव करण्यासाठी हा दिवस [illegible] केला जातो. भारतामध्ये अतिरिक्त लोकसंख्या ही मुख्य समस्या आहे. भारताला जर विकसित राष्ट्र करायचे असेल तर प्रथम लोकसंख्या नियंत्रित ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी कठोर कायद्यांची आवश्यकता आहे. असे केले तरच देश विकसित होऊ शकतो, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते डॉ. एस. यू. देवरे यांनी केले.

सुरगाणा येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. त्यांनी मानवाच्या हव्यासामुळे लोकसंख्येविषयी अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने संकल्प करून लोकसंख्या नियत्रंनात आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. कार्यक्रमाचे प्रस्ताविक भूगोल विभागप्रमुख उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे यांनी केले. भूगोल विभागातर्फे जागतिकीकरण व लोकसंख्येविषयी असणारे प्रश्न समाजपुढे आणण्यासाठी आणि जागृती निर्माण करण्यासाठी असे वेगवेगळे कार्यकम आयोजित केले जातात. सूत्रसंचालन शैक्षणिक सुपरवायझर प्रा. एस. एम. भोये यांनी केले. प्रा. आर. ए. जगताप यांनी आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Deshdoot 12_7